लेखांक २ नीतिशास्त्र पर्यावरणाचे आणि शेतीचे ०७ जानेवारी २०१०

नीतिशास्त्र : पर्यावरणाचे आणि शेतीचे

श्रीनिवास हेमाडे

*परिचयाच्या पहिल्या लेखात आपण असे म्हंटले आहे ही काळ्या आईच्या दुःखाची आणि 'काळ्या आईशी चांगले कसे वागावे आणि का वागले पाहिजे', याची कथा आहे.काळ्या आईचे दुःख कमी कसे होईल, त्या दुःखावर उपचार कोणता केला पाहिजे, याचा विचार तिच्याच काही सुजाण मुलांनी केला असून त्याचाच परिचय या लेखमालेत आपण करून घेणार आहोत.*

चांगले वागणे म्हणजे नैतिक वागणे, असे आपण समजतो.या नैतिकतेचा किंवा नीतिचा अभ्यास करणारे एक शास्त्र असून त्याचे नाव नीतिशास्त्र ! चांगले म्हणजे नैतिक, हे अतिशय साधे सरळ व भाबडे गणित झाले.माणसांनी एकमेकांशी चांगले वागावे, ही अपेक्षा असते खरी.पण तसे घडतेच असे नाही.माणसांबरोबरच इतर सजीव प्राणीही आपल्या परिसरात असतात. ते सुध्दा आपल्याच समाजाचेच घटक आहेत. पण माणूस त्यांच्याशीही चांगला वागेल, असे नाही. मग निर्जीव जमिनीशी माणूस चांगला वागेल, याचा विचार कसा करणार ? मुळात जमिनीशी चांगले - वाईट वागण्याचा संबंध येतोच कुठे ? असाही प्रश्न उपस्थित होवू शकतो.त्यातही शेतजमिनीशी चांगले कसे वागणार ? हीच समस्या पर्यावरणाशी सुध्दा जोडलेली आहे. पर्यावरणाशी चांगले वागावयाचे म्हणजे नेमके कसे वागावयाचे ?

येथे दोन प्रश्न आहेत.शेतजमिनीशी चांगले कसे वागावे ? आणि पर्यावरणाशी चांगले कसे वागावे ? हे दोन्ही प्रश्न खरे तर वेगळे नाहीत.कारण शेती आणि पर्यावरण हेच वेगळे नाहीत.एकाच व्यापक जैविक रचनेचा ते घटक आहेत.त्यांच्यातील परस्परसंबंध जैविक स्वरूपाचा आहे.पर्यावरण व्यापक आहे तर शेती या पर्यावरणाचा हिस्सा आहे.पर्यावरणात शेतजमिनीसह इतर बिनशेती जमिन, जंगले, वने, नाले, नद्या, समुद्र, महासागरे,हिमशिखरे,दऱ्या - खोरी,डोंगर - पर्वतराजी यांचा तसेच मच्छरापासून महाकाय देवमाशापर्यंत सर्व तऱ्हेचे भूचर,जलचर, जंगलवासी तसेच माणसाळलेले पशुपक्षी अशा दृश्य - अदृश्य सर्व प्रकारच्या सजीवांचा समावेश होतो.अर्थात माणसाचाही त्यात समावेश होतो.

थोडक्यात पर्यावरणात कच्चा, भरड निसर्ग तर आहेच पण कृत्रिमरित्या विकसित झालेली मानवी संस्कृति आणि शेती संस्कृति यांचा सुध्दा समावेश आहे.त्यामुळेच पर्यावरण ही अतिशय व्यापक गोष्ट आहे.शेती पर्यावरणाचाच हिस्सा असलयाने शेतीचे प्रश्न हे सुध्दा पर्यावरणाचे प्रश्न होतात. पर्यावरणाचे प्रश्न हे शेतीचेही प्रश्न होतात.शेती हाही पर्यावरणाचाच घटक आहे.

शेती व पर्यावरण या दोन घटकांचे स्वरूप परस्परावलंबी आहे.त्या वेगळ्या आहेत, असे वाटते. पण तसे नाही् त्या गोष्टी वेगळ्या दाखविता;पण वेगळ्या करता येत नाहीत.त्या वेगळ्या करण्याचा प्रयत्न केलाच तर दोन्हीना धोका पोहोचतो, इतके शेती व पर्यावरण एकरूप आहेत.

या दोन्हीशी माणसाचे वर्तन चांगले असले पाहिजे.संत शिरोमणी तुकोबारायांच्या ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे l पक्षीही सुस्वरे आळविती '' किंवा संत सावता माळ्याच्या '' कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी l लसूण मिरची कोथिंबीरी अवघा झाला माझा हरि '' अथवा जनाबाईच्या ''दळिता कांडिता तुज गाईन अनंता '' या परिभाषेत ते वर्तन असले पाहिजे. साहजिकच शेतीविषयक आणि पर्यावरणविषयक चांगले धोरण आखणे म्हणजे म्हणजे शेतीचे आणि पर्यावरणाचे नीतिशास्त्र रचणे होय.

नीतिशास्त्र हे कुणी कुणाशी कसे वागावे, याचे व्यापक धोरण व नियम ठरविणारे शास्त्र असते.ती तत्त्वज्ञानाची गोष्ट आहे.पुढील लेखांकात आपण आधी नीतिशास्त्राची ओळख करून घेवू आणि मग शेतीच्या आणि पर्यावरणाच्या नीतिशास्त्राचा परिचय करून घेवू.